**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

113

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ७१/२०१८-१९/११३ दिनांक: १७.००६.२०१९

**आदेश**

**आदेश केस क्र. ७१ (२०१८-२०१९)**

**तक्रारदार** - श्री चद्रकांत एकनाथ भंडारी **अर्जदार**
व सौ एस.एम.कोरे
वॉर्ड क्र. १३ क्र. ऊरुण नाका
इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**पक्षकार**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय इचलकरंजी

३) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभाग इचलकरंजी "ब "

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.के. ताडे, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य, (आजारपणामुळे अनुपस्थित)

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**आदेश**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

17/6/2019

प्रस्तुतची तक्रार, उपरोक्त तक्रारदारांनी त्यांचे वॉर्ड क्र.१३ घर क्र.११९२, गट क्र. ४६१/१ गुरुकन्ननगर इचलकरंजी येथे अनुक्रमे ६३ अश्वशक्ती व ९ अश्वशक्ती विद्युत भाराचे दोन स्वतंत्र विज कनेक्शन घेण्याकरता त्यांनी केलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर खर्चाचा परतावा, द.सा.द.शे. १२ टक्के दराने प्रत्यक्ष रक्कम भरलेलेल्या दिनांकापासून ते प्रत्यक्ष देय दिनांकापर्यन्त, व्याजासह मिळण्याकरिता दाखल केलेली आहे.

तक्रारदाराच्या कथनानुसार वर नमूद स्थळी व वर नमूद विद्युत भाराच्या त्यांचे नावे स्वतंत्र विद्युत जोडणी , विज वितरण कंपनीच्या इचलकरंजी विभागाचे अंदाजपत्रक क्र. EE/ICH/ORC (P)/१०४/०५०६ दिनांक ३१.०८.२००५ अन्वये कार्यकारी अभियंता इचलकरंजी यांनी आपले पत्र क्र.१६६२, दिनांक ३१.०८.२००५ च्या मंजूर पत्राप्रमाणे औद्योगिक विज जोडणी करिता देण्यात आले सदर कामाकरिता प्रशासकीय मंजूरी SE/KPC/TADM/०५-०६/६७/ICH/२८/२३७५ दिनांक २६.०८.२००५ चे पत्राने देण्यात आलेली होती. विज जोडणी मंजूर करताना त्या कनेक्शनसाठी लागणारे इन्फ्रास्क्ट्रक्चर , उभय तक्रारदारांनी एकत्रितरित्या स्वःखर्चाने तयार करावे अशी अट घालण्यात आलेली होती. तक्रारदारांचे कथनेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. ४३०५ /२००७ या प्रकरणात पारित केलेल्या आदेशानुसार विज वितरण कंपनी ग्राहकांना ओआरसी /एसएलसी /मिटर चार्जेस चा परतावा करिता आहे. तक्रारदारांनी अंदाजपत्रकानुसार रु. ४,०८,८३१/- खर्च करुन इन्फ्रास्ट्रक्चर उभे केलेले आहे. विज वितरण कंपनीने दिनांक १२.१०.२०१७ ला निर्गमित केलेल्या परिपत्रक क्र. मु.अ.(वितरण)/D-४/म.वि.नि.आयोग/२५०७९ तथा विज नियमक आयोगाने केस क्र. ८२/२००६ मध्ये पारित केलेल्या दिनांक १७.०५.२००७ तर दिनांक २१.०८.२००७ रोजी त्याच प्रकरणांत पारित केलेला आदेश तसेच विद्युत लोकपाल यांनी केस १८९ आणि १९०/२०१८ व या मंचाने तक्रार क्र. ५२/२०१८-१९ मध्ये दिनांक ०४.०४.२०१९ रोजी बहुमताने पारित केलेल्या आदेशानुसार तक्रारदारांना सदर रक्कमेचा परतावा मिळण्याचा अधिकार आहे. अशा कथना वरुन तक्रारदारांनी वर नमूद केलेली रक्कम परतावा मागणी व्याजासहित केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणांची नोटीस मिळाल्यानंतर विज वितरण कंपनीने कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय इचलकरंजी यांचे मार्फत हजर होऊन खालील प्रमाणे आपले म्हणणे मांडलेलेआहे.

१. श्री चंद्रकांत एकनाथ भंडारे यांनी १३/११९२ गट क्र. ४६१ गुरुकन्ननगर इचलकरंजी येथे ६३ अश्वशक्ती पॉवरलूम वापरासाठी विज कनेक्शन मागणी दिनांक १३.०४.२००५ नुसार केली होती. तसेच सौ. सुनिता महादेव कोरे यांनी १३/११९२ गट क्र. ४६१/१ गुरुकन्ननगर इचलकरंजी येथील त्यांच्या ग्राहक क्र. २५०३८१९०२८८ या ९ अश्वशक्ती पॉवरलूम कनेक्शनच्या जोड भारामध्ये वाढिव १० अश्वशक्ती एकूण १९ अश्वशक्ती अशी मागणी दिनांक ०४.०१.२००५ नुसार केली होती.

२. इचलकरंजी अ उपविभागामधील उपलब्ध दस्त ऐवजानुसार वरील मागणी अर्जास विभागीय कार्यालय इचलकरंजी यांचे कडून EE/ICH/ORC(P)/१०४/२००५-६ दिनांक ३१.०८.२००५ नुसार मंजूरी देणत आली . सदर अंदाजपत्रका मधील मंजूर करणेत आलेली कामे पुर्ण झालेनंतर श्री चंद्रकांत एकनाथ भंडारी ग्राहक क्र. २५०३८०१९११८७ यांचे ६३ अश्वशक्ती पॉवरलूम कनेक्शन १३.१०.२००५ व सौ. सुनिता महादेव कोरी ग्राहक क्र. २५०३८१९०२८८ यांचे वाढिव १० अश्वशक्ती एकूण १९ अश्वशक्ती कनेक्शन जोडणी करणेत आले.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

३. विज जोडणी मागणी करतेवेळी अर्जदाराने त्यांचे कनेक्शन जोडणी करणेसाठी करावयाचे काम स्वःखर्चाने करावयाची तयारी दर्शविली होती व त्यास त्यांची पुर्ण संमती होती. ORC(P)/१०४/२००५-०६ नुसार मंजूर करणेत आलेल्या पायाभूत सुविधासाठीचे कामासाठी या अर्जदारांनी कोणताही विरोध केला नव्हता अथवा Under Protest काम करित असलेबाबत या कार्यालयास कळविले नव्हते.

४. अंदाजपत्रक हे EE/ICH/ORC(P)/१०४/२००५-०६ नुसार ORC(P) या योजने अंतर्गत मंजूर करणेत आले होते. त्यामुळे या योजनेतील तरतूदी नुसार अंदाजपत्रकातील रक्कम परत देणे लागत नाही. ग्राहकास तातडीने विज जोडणी हवी असलेने ग्राहकांनी स्वःखर्चाने कोणताही विरोध न दर्शविता ORC(P) या योजनेतून काम केले आहे व ओआरसी( पी ) या योजने अंतर्गत ग्राहकास विज जोडणी करणेत आलेली आहे. ग्राहकानी विद्युत पुरवठयाच्या अटी व शर्ती विनियम मधील मुद्दा क्र. ३.३.८ नुसार मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून काम करुन घेतले आहे.

५. ग्राहकानी कनेक्शन जोडणी करणेसाठी खालील प्रमाणे रक्कम भरणा केली आहे.

| तपशील | श्री चंद्रकांत एकनाथ भंडारे | सौ. सुनिता महादेव कोरे |
|---|---|---|
| सर्व्हिस कनेक्शन चार्जेस पोटी १५% लेबर चार्जेस | रु. १६५०/- | रु. ३५००/- |
| सी.टी. ऑपरेटेड मिटर चार्जेस | रु. २३०००/- | रु. २२५०/- मिटर चार्जेस |
| कपॅसिटर टेस्टीग चार्जेस | रु. १००/- | रु. १००/- |
| १५% सुपरव्हीजन चार्जेस अंदाजपत्रक मंजूरीनुसार | रु. ४९६५/- | रु. ७०००/- SLC |
| डी.टी.सी. मिटर चार्जेस | रु. १९०००/- | रु. २० करार पत्र |
| एकूण | रु. ४८७१५/- | रु. १२८७०/- |
| पावती क्रमांक | १४८९५८४ दि. ०९.०९.२००५ | ५४५९०२१ दि. ०९.०३.२००५ |

६. वरील पैकी चंद्रकांत एकनाथ भंडारे यांच्या दिनांक १८.०१.२०१८ च्या मागणी अर्जानुसार दिनांक ०९.०९.२००५(ग्राहकाने पैसे भरलेली तारीख) ते दिनांक ३०.०४.२००७ (परीपत्रकामध्ये नमूद तारीख) या कालावधीकरिता सी.टी ऑपरेटेडमिटर कॉस्ट रु. २३०००/- यावर ६% दराने व्याजाची आकारणी करणेत आली. त्या व्याजाची रक्कम रु. २२९२/- व मिटर कॉस्ट रक्कम रु. २३०००/-अशी एकूण मिळून २५२९२/- एवढी रक्कम ग्राहकास त्यांचे माहे एप्रिल २०१८ चे बिलामधून परतावा देणेत आलेली आहे व सुनिता महादेव कोरे यांनी भरणा केलेली एसएलसी रक्कम रु. ७०००/- व मिटर कॉस्ट रु. २२५०/- एकूण रु. ९२५०/- व मार्च २०१९ चे बिलातून रु. ७३३५/- परतावा देणेत आलेला आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

७. तथापी अंदाजपत्रकातील पायाभूत सूविधा उभारणीसाठीची रक्कम रु. ३,६४,४१६/- याचा भरणा महावितरणकडे केलेला नाही हे येथे नमूद करणेत येत आहे. EE/ICH/ORC(P)/१०४/२००५-०६ नुसार ORC(P) या योजने अंतर्गत मंजूर करणेत आलेले Infrastructure हे ग्राहकाने स्व:खर्चाने व स्वखुशीने कोणताही विरोध न दर्शवता त्यावेळी पुर्ण केले आहे. सदर काम पूर्ण करणेसाठी Undertaking ही दिले आहे. सदर काम हे २००५ साली म्हणजे सुमारे १४ वर्षापूर्वी पुर्ण केले आहे. कोणत्याही प्रकारचे गा-हाणे हे दोन वर्षाच्या आत सादर करणे हे ग्राहक तक्रार मंच व मा. लोकायुक्त अधिनियम २००३नियम ६.६ नुसार गरजेचे आहे. त्यामुळे सदरचे गा-हाणे दाखल करणेचा कालावधी संपून गेला आहे हे या ठिकाणी नमूद करणेत येत आहे.

८. चंद्रकांत एकनाथ भंडारे व सुनिता महादेव कोरे यांनी मंडल कार्यालय अंतर्गत तक्रार निवारण केंद्राकडे दिनांक ०८.०८.२०१८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला त्यामध्ये त्यांनी वीज जोडणी केलेल्या खचार्चा रु. ४६,९६५/- परतावा मागीतला आहे. तथापी आपल्या फोरमकडे सादर केलेल्या दिनांक ०२.०१.२०१९ च्या तक्रार अर्जामध्ये रु. ४,०८,८३१/- इतक्या EE/ICH/ORC(P)/१०४/२००५-०६ नुसार ORC(P) या योजने अंतर्गत मंजूर करणेत आलेल्या रक्कमेच्या परताव्याची मागणी केली आहे. सदर मागणी ही मंडल कार्यालया अंतर्गत तक्रार निवारण केंद्राकडे केलेली नाही. Electricity Regulatory Commission Regulation २००६ मधील ६.७ मधील तरतूदीनुसार पथम मंडल कार्यालय अंतर्गत तक्रार निवारण केंद्राकडे करणे आवश्यक आहे.

९. ग्राहकाने आपल्या तक्रार अर्जात उल्लेख केलेली Complaint No.१६/२०१८ दिनांक २८.०५.२०१८ ही केस Non DDF CCRF च्या Infrastructure cost परताव्या बाबत आहे. सदर ग्राहकांची मंजूरी EE/ICH/ORC(P)/१०४/२००५-०६ नुसार ORC(P) या योजने अंतर्गत मंजूर करणेत आलेली आहे. त्यामुळे Complaint No.१६/२०१८ दिनांक २८.०५.२०१८ या केसचा निकाल या ग्राहकांना लागू होत नाही.

१०. MERC Case No. ८२/२००६ च्या निकालामध्ये Hon. Commission यांनी ORC अंतर्गत घेतलेल्या रक्कमेचा परतावा करणे बाबत सुचना केली आहे त्यामध्ये Infrastructure cost परताव्याबाबतची सुचना नाही. सदर ग्राहकाना मंजूर केलेले अंदाजपत्रक हे पायाभुत सुधारणेसाठी ORC(P) या योजने अंतर्गत मंजूर करणेत आले आहे. त्यामुळे ग्राहकाने मागणी केलेल्या परतावा करता येत नाही.

११. त्याच प्रमाणे Representation No. १८९ of २०१८ च्या मा. विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या Refund of Infrastructure cost या केसच्या निकाला मध्ये SLC, ORC व Meter cost बाबत सांगितले आहे Infrastructure cost परतावा बाबतची सुचना नाही. तसेच त्यामध्ये गा-हाणे मुदतबाहय वेळेत सादर केलेमुळे Infrastructure cost परतावा नाकारण्याचे आदेश देणेत आलेले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

१२. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांचे अपिल क्र. ४३०५/२००५ मधील निकाल व परिपत्रक २५०७९ दिनांक २९-१२-२०१७ नुसार पात्र ग्राहकाना फक्त SLC , ORC व Meter cost जी महावितरणकडे २०.१०.२००५ ते २०.०५.२००८ या कालावधीत भरणा केलेली आहे तो परत करणेचा आदेश देणेत आलेला आहे. ग्राहकाने मागितलेला पायाभूत आराखडा परतावा व मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा वेगळा विषय (ORC(P) असलेचे दिसून येते. त्यामुळे ग्राहकाने मागणी केलेला परतावा करता येत नाही.

अशा कथनावरुन विज वितरण कंपनीने प्रस्तुतची तक्रार ना मंजूर करावी अशी मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दिनांक २४.०४.२०१९ व २४.०५.२०१९ या तारखांना घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदारांतर्फे प्रतिनिधी श्री मुकुंद माळी व विज वितरण तर्फे श्री कोळी कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय इचलकरंजी हे उपस्थित होते. त्यानी आपआपल्या पक्षकथनाप्रमाणे या मंचासमोर युक्तीवाद सादर केला .

या दोन्ही सुनावणी दिवशी या मंचाचे ग्राहक सदस्य श्री प्रशांत पुजारी हे हजर होते तथापि मध्यतंरीच्या काळांत प्रक्रृति अस्वास्थ्या मुळे त्यांना ईस्पितळात दाखल करण्यात आलेले असून त्याची मंचातील अनुपस्थिती ही अनिश्चित काळाकरता असण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ च्या नियम ५.२ अनुसार मंचाचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांची उपस्थिती ही आवश्यक गणपुर्ती धरुन प्रस्तुत प्रकरणांत विलंब टाळण्याकरता हा निकाल पारित करण्यात येत आहे.

५. उभय प्रकरणी आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | उभय तक्रारदाराच्या मागण्या मंजूर होण्यास पात्र आहेत काय? | नाही |
| २ | अंतिम आदेश? | खालील प्रमाणे |

६. आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

## कारणमिमांसा

७. **मुद्दा क्रमांक १ व २ :-** या प्रकरणांतील तक्रारदारांच्या Infrastructure cost च्या मागणीची वैधता किंवा अवैधता (legality or otherwise ) या प्रश्नांत जाण्याऐवजी ज्या स्वरुपात तक्रारदारांनी ही तक्रार या मंचापुढे सादर केलेली आहे ती पहाता तक्रारदारांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षासमोर दाखल केलेली तक्रार आणि प्रस्तुत तक्रार यामध्ये विसंगती असल्याचे दिसते त्या कारणावरुन जाब देणार वितरण कंपनीतर्फे अंतिरिक्त कार्यकारी अभियंता इचलकरंजी श्री सचिन कोरडे हयानी आपल्या युक्तीवादात ती बाब या मंचाच्या निर्दशनास आणून दिलेली आहे. श्री कोरडे यांनी या मंचाचे लक्ष तक्रारदारांनी जी तक्रार अंतर्गत तक्रार निवारण कक्षासमोर दाखल केलेली होती. त्याकडे वेधले त्या तक्रार अर्जामध्ये इतर ११ तक्रारदारासमवेत प्रस्तुत

तक्रारदारांनी ओआरसी चार्जेस पोटी घेतलेल्या रक्कमेवरील व्याजाची आकारणी प्रत्यक्ष रक्कम भरलेल्या दिनांकापासून ते प्रत्यक्ष देय दिनांकापर्यन्त द.सा.द.शे. १२टक्के दराने करावी व ती तक्रारदाराना देण्यात यावी. त्या तक्रार अर्जात प्रस्तुतचे तक्रारदार श्री चंद्रकांत एकनाथ भडारी व त्या प्रकरणांतील दुसरे तक्रारदार श्री प्रेमसिंह ईश्वरसिंह चव्हाण यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व तक्रारदार, ज्यात प्रस्तुत तक्रारदार सौ. एस.एम.कोरी यांचा देखिल समावेश होता, हयाना ओआरसी , एसएलसी, मिटर कॉस्टचा परतावा देण्यात आलेला असून त्या रक्कमावर दिनांक २०.०१.२००५ ते दिनांक ३०.०४.२००७ या कालावधीकरता द.सा.द.शे. ६ टक्के दराने व्याजासह करण्यात आलेला आहे, असे विज वितरण कंपनीचे म्हणणे होते. अंतर्गत तक्रार तक्रार निवारण कक्षासमोर कुठेही दोन्हीही तक्रारदारांनी Infrastructure cost ची मागणी केलेली नव्हती. त्या तक्रार अर्जात Infrastructure cost ची मागणी करण्याकरिता तक्रारदारांना कोणतीही कायदेशीर अडचण नव्हती. प्रस्तुत तक्रारदार चंद्रकांत भडारी यांची ओआरसी एसएलसी मीटर कॉस्टचा परतावा मिळण्याची मागणी त्यानी महावितरणकडे त्याबाबत कोणत्याही रक्कमा भरल्या नसल्याने, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने फेटाळून लावलेली आहे. तक्रारदारांने या तक्रार अर्जामध्ये ओआरसी(पी) योजने अंतर्गत इस्टमेंट रक्कमेवरील व्याजाची आकारणी प्रत्यक्ष रक्कम भरलेल्या दिनांकापासून व्हावी व हिशोबाची प्रत उपलब्ध व्हावी आणि इतर न्यायाचे निर्णय त्यांचे बाजून व्हावे अशी मागणी केलेली आहे. संपूर्ण परिशिष्ट "अ" या तक्रार अर्जात तक्रारारांनी कुठेही विज जोडणी घेताना त्यांनी Infrastructure cost सहन केलेली आहे, आणि असल्यास किती रक्कमेचे केलेली आहे. हे कुठेही स्पष्टपणे नमूद केलेले नाही किंवा या संबंधीचा कोणताही पुरावा या मंचासमोर आणलेला नाही. दिनांक २२.०४.२०१९ रोजी तक्रारदारांनी या मंचासमोर एक अर्ज दाखल करुन त्याचे विज जोडणीचे अर्जास मंजूरी देताना त्यासाठी लागणारे Infrastructure cost (ORC-P) , एकत्रित स्वःखर्चाने अशी अट घालून मंजूर देण्यात आलेली होती ,व त्यानंतर विज जोडणी कामे झाल्यानतर त्या कामासाठी प्रशासकीय मंजूरी क्रमांक SE/KPC/TADM/०५-०६/६७/ICH/२८/२३७५ प्रमाणे रु. ४,०८,८३१/- दिनांक ३१.०८.२००५ रोजी देणात आलेली आहे .व त्याप्रमाणे ग्राहकांने स्वतः केलेला खर्च रु. ४,०८,८३१/- आज अखेर ६ टक्के व्याज दराने परतावा देण्याची आदेश व्हावेत, व सदर रक्कम दोघी तक्रारदारांना HP मंजूरी प्रमाणे मिळावे अशी मागणी केलेली आहे.

तक्रारदारांना अंतर्गत तक्रार निवारण कक्षासमोर त्यांनी कथिरित्या केलेला Infrastructure चा खर्च रक्कम रु. ४,०८,८३१/- मागण्यात काही अडथळा नव्हता. ज्या अर्थी त्यांनी ओआरसी एसएलसी आणि मीटर कॉस्टवर व्याजाची मागणी केलेली होती त्या अर्थी त्यांना Infrastructure cost चा परतावा देखिल मागता येतो हयाची माहिती होती, हे स्वयंस्पष्ट आहे. संधी उपलब्ध असताना तक्रारदारांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षासमोर Infrastructure cost ची देखिल मागणी का केली नाही . याबद्दल कोणतेही स्पष्टी "अ " मधील तक्रार अर्जामध्ये कुठेही स्पष्टपणे Infrastructure cost ची मागणी केलेचे दिसत नाही. त्या फक्त ते Infrastructure cost च्या रक्कमेवर व्याजाची आकारणी प्रत्यक्ष रक्कम भरलेल्या दिनांकापासून ते प्रत्यक्ष देय दिनांकापर्यन्त द.सा.द.शे. १२टक्के दराने व्हावी अशी मागणी करतात. तिथे तक्रारदार Infrastructure cost ची मागणी करत नाही. पण दिनांक २२.०४.२०१९ च्या अर्जामध्ये Infrastructure cost रक्कम रु. ४,०८,८३१/- ही द.सा.द.शे. ६ टक्के व्याजाने परतावा देण्याची आदेश व्हावे अशी मागणी करतात. वर नमूद केलेल्याप्रमाणे स्वतः एवढी मोठी रक्कम खर्च केलेली आहे. असा कोणताही पुरावा त्यानी दिलेला नाही. फक्त एक अंदाजपत्रकाची प्रत या कामी दाखल केलेली आहे. या वरुन हे स्पष्ट होते तक्रारदारांच्या एकूण मागणीमध्ये

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

सुसंगती (consistency) नाही.अंतर्गत तक्रार निवारण कक्षा पुढे Infrastructure cost ची मागणी करण्यात कोणतीही कायदेशीर अडचण नसताना तिथे तक्रारदारांनी मागणी केलेली नाही .या मंचापुढे तक्रार अर्जामध्ये केवळ Infrastructure cost च्या रक्कमेवर वर नमूद केलेल्या दराने आकारणी होण्याचा आदेश व्हावा अशी तक्रारदार मागणी करतात तर २२.०४.२०१९ च्या अर्जात Infrastructure cost ची रक्कम रु. ४,०८,८३१/- ची मागणी कोणताही पुरावा न करता देतात, आणि अंतर्गत तक्रार निवारण मंचापुढे सादर केलेल्या अर्जात केवळ व्याजाची मागणी केलेली होती अशी मखलशी करतात. त्यामुळे तक्रारदारांच्या अंतर्गत तक्रार निवारण कक्ष आणि हे मंच यांच्यापुढे केलेल्या मागण्यामध्ये एक व्याख्यता नाही . तक्रारदार सोयीप्रमाणे आपल्या मागण्या बदलताना दिसतात. हे कायदयाला अनुसरुन नाही. तक्रारदाराच्या वेळोवेळी केलेल्या मागण्यामध्ये असलेल्या विसंगतीमुळे ही तक्रार कायदयाने चालविण्यास पात्र नाही व ती केवळ याच मुद्यावरुन खारीज करण्यास पात्र आहे ,असा या मंचा निष्कर्ष आहे. सबब मुद्दा क्रमांक एकचे उत्तर आम्ही नकारार्थी देत खालील आदेश पारित करित आहोत.

## आदेश

१) तक्रार अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

07/06/19

(एन.के.ताडे)
सदस्य सचिव

7/6/2019

(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण